मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# दिवाळी फराळाच्या निमित्ताने सर्वपक्षीय नेत्यांची गप्पांची मैफल

## राजकीय नेत्यांनी एकत्रितपणे दिवाळी फराळाचा मनमुराद आनंद घेतला

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** नेहमीचे हेवेदावे, कुरघोडीचे राजकारण बाजूला ठेवून राजकीय नेत्यांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शनिवारी (११ नोव्हेंबर) एकत्रितपणे दिवाळी फराळाचा मनमुराद आनंद घेतला. यावेळी खेळीमेळीच्या वातावरणात जवळपास तीन तास गप्पांची मैफल रंगली. दिशा सोशल फाऊंडेशनच्या वतीने यंदा आठव्या वर्षी दिवाळी फराळाचे आयोजन करण्यात आले. काळेवाडी येथील आरंभ सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात अभिनेते प्रवीण तरडे यांच्या वाढदिवसानिमित्त माजी मंत्री बाळा भेगडे आणि आमदार अण्णा बनसोडे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. खासदार श्रीरंग बारणे, माजी खासदार अमर साबळे, माजी मंत्री बाळा भेगडे, आमदार अण्णा बनसोडे, माजी आमदार दिपक पायगुडे, अभिनेते प्रविण तरडे, देवदत्त नागे,



पिंपरी प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, वनराईचे अध्यक्ष रवींद्र धारिया, राज्य नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईर, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप, काँग्रेसचे शहराध्यक्ष कैलास कदम, मनसेचे शहराध्यक्ष सचिन चिखले तसेच माजी शहराध्यक्ष संजोग वाघेरे, वसंत लोंढे, सचिन साठे, राहुल कलाटे, योगेश बाबर, माजी महापौर नितीन काळजे, राहुल जाधव, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे, माजी नगरसेवक राजू मिसाळ, जगदीश शेट्टी, सुरेश भोईर, सुरेश म्हेत्रे, धनंजय काळभोर, बाळासाहेब बोडके, बाळासाहेब मोरे, मयूर कलाटे, शत्रुघ्न काटे, तुषार हिंगे, विक्रांत लांडे, पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, अर्जुन पुरस्कार विजेते शांताराम जाधव, गोपाळ देवांग, रुस्तम ए हिंद अमोल बुचडे, प्रेरणा बँकेचे अध्यक्ष कांतीलाल गुजर, इंद्रायणी बँकेचे संस्थापक ॲड. एस. बी. चांडक, शिक्षणाधिकारी भाऊसाहेब कारेकर, प्राचार्य मनोहर चासकर, नितीन घोरपडे, पंडित शेळके, ज्येष्ठ साहित्यिक तुकाराम पाटील, बबन मिंढे, राजेंद्र घावटे, रमेश वाकनिस, राज अहिरराव, सहायक आयुक्त अण्णा बोदडे, उद्योजक विजय जगताप, वसंत काटे, ओमप्रकाश पेठे, लघुउद्योग संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे, संजय जगताप, बाळासाहेब विनोदे, पिंपरी चिंचवड शरीर सौष्ठव संघटनेचे अध्यक्ष मनोज जरे, गुलाब वाघोले, लीड मीडियाचे प्रमुख विनोद सातव, युवा नेते विशाल काळभोर, माजी सरपंच श्रीकांत जाधव, प्रवीण जांभूळकर आदींनी हजेरी लावली. यावेळी आयर्नमॅन स्वप्निल चिंचवडे, शूटिंग स्पर्धेत सुवर्णपदक विजेती आर्या म्हस्के यांना दिशागौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. जवळपास तीन तास चाललेल्या या कार्यक्रमात विविध विषयांवर चर्चा झाली. दिशा सोशल फाऊंडेशनचे अध्यक्ष जगन्नाथ उर्फ नाना शिवले, उपाध्यक्ष संतोष बाबर, कार्याध्यक्ष राजेंद्र करपे, सचिव संतोष निंबाळकर, खजिनदार नंदकुमार कांबळे, माजी अध्यक्ष गोरख भालेकर, माजी कार्याध्यक्ष सचिन साठे आदींसह दिशा सोशल फाऊंडेशनच्या सदस्यांनी संयोजन केले. प्रवीण तरडे : सार्वजनिक जीवनाच्या विविध क्षेत्रातील मान्यवरांना एकाच व्यासपीठावर आणून सांस्कृतिक विचारांची दिवाळी साजरी करण्याचा अनोखा उपक्रम दिशाने सातत्याने राबविला आहे. मी ही या संस्थेचा एक भाग आहे, याचा मला अभिमान वाटतो. देवदत्त नागे : दिवाळीचा सण हा प्रकाशाचा उत्सव आहे. स्नेह, आपुलकी आणि एकात्मता जपणारा उत्सव आहे. दिवाळी फराळाच्या निमित्ताने आपल्यातील स्नेह आणि आपुलकी अधिक वाढावी म्हणून अशा प्रकारचे कार्यक्रम प्रत्येक शहरात राबविले पाहिजेत. खासदार श्रीरंग बारणे : प्रत्येक जण प्रत्येक वेळी आपल्या स्वतः च्या व्यासपीठावर आपले विचार व्यक्त करत असतो, परंतु दिशा ही संस्था याला अपवाद आहे.

# दिपावलीमध्ये आतषबाजी करण्यासाठी वेळेचे बंधन?

## वायू प्रदूषणावरही बारकाईने ठेवले जाणार लक्ष

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** शहरातील वायू प्रदूषणाला आळा घालण्यासाठी तसेच मार्गदर्शक सूचनांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्रभागनिहाय विशेष पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. महापालिकेने नव्याने लागू केलेल्या उपाययोजनांतर्गत महापालिका कार्यक्षेत्रातील ३२ प्रभागांमध्ये एकूण १६ विशेष वायु प्रदूषण देखरेख पथक तैनात करण्याच्या सूचना आयुक्त शेखर सिंह यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. या पथकांमध्ये उपअभियंता, स्वच्छता निरीक्षक, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक आणि एमएसएफ कर्मचारी यांचा समावेश आहे. वायू प्रदूषण नियंत्रण पथकाचे प्राथमिक कर्तव्य त्यांच्या संबंधित प्रभागातील बांधकाम स्थळांना भेट देणे, फोटो किंवा व्हिडिओग्राफीद्वारे त्याची नोंद घेणे, यादरम्यान प्रदूषण नियंत्रण तरतुदींचे पालन न केल्याचे उघड झाल्यास दंड आकारणे, नोटिस जारी करणे किंवा कामाची जागा सील करून दंडात्मक कारवाई करणे हे असणार आहे. नोटीस बजावलेल्यांची



संख्या, वसूल केलेला दंड आणि दररोज होणाऱ्या कारवाईची या पथकांद्वारे नोंद ठेवण्यात येणार आहे. पर्यावरण संरक्षण कायदा १९८६, वायू (प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा १९८१ नुसार नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे. महापालिकेने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार खाजगी आणि सार्वजनिक अशा दोन्ही प्रकारच्या बांधकाम सुरू असलेल्या इमारतींच्या बाजूने हिरवे कापड तसेच ज्यूट शीट ताडपत्रीने कव्हर करणे बंधनकारक असणार आहे. बांधकाम पाडताना त्यावर सलग पाणी फवारणे शिंपडणे तसेच काम सुरू असताना त्यासाठी लागणारे बांधकाम साहित्य लोडींग अनलोडींग दरम्यान पाणी फवारले जाईल याची खात्री करणे आवश्यक आहे. तसेच या उपाययोजनांसाठी जवळच्या महापालिका सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या पुनर्वापर केलेल्या पाण्याचा वापर करावा. शिवाय, शहरातील बांधकामाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे, सेन्सरवर आधारित वायू प्रदूषण मॉनिटर्स बसविणे आणि बांधकाम कर्मचार्यांसाठी वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे वापरणे यावरही भर दिला जाणार आहे. आयुक्त शेखर सिंह म्हणाले, घनकचऱ्यासह इतर कोणत्याही प्रकारचा कचरा उघड्यावर जाळण्यास सक्त मनाई असून नागरिक स्मार्ट सारथी ॲपमध्ये दिलेल्या पोस्ट अ वेस्ट या सुविधेद्वारे अशा घटनांची तक्रार करू शकतात. विशेषतः कचरा डंपिंग ग्राउंड आणि संभाव्य कचरा जाळण्याच्या ठिकाणीही उघड्यावर कचरा जाळण्यास बंदी लागू करण्यात आली आहे.

# पिंपळे सौदागरमध्ये रंगली स्वरांजली दीपावली पहाटची सुरेल मैफिल!

## नगरसेवक शत्रुघ्न काटे युथ फाऊंडेशन यांच्या सौजन्याने स्वरांजली



**पिंपरी । न्यूज एक्सप्रेस मराठी।** दिवाळी निमित्त प्रतिवर्षीप्रमाणे शुक्रवार दि.१० नोव्हेंबर आणि शनिवार दि.११ नोव्हेंबर रोजी नगरसेवक शत्रुघ्न काटे युथ फाऊंडेशन यांच्या सौजन्याने स्वरांजली दीपावली पहाट या सुमधुर संगीत कार्यक्रमाचे आयोजन पिंपळे सौदागर मध्ये करण्यात आले होते. स्वरांजली दीपावली पहाट या कार्यक्रमात सावनी रविंद्र, चैतन्य देवढे, अंशिका चोणकर आणि हिम्मत कुमार पंड्या या दिग्गज गायक गायिकांच्या एका पेक्षा एक सरस मधुर मराठी अजरामर गाण्यांची मेजवानी पिंपळे सौदागर, रहाटणीवासियांना लाभली. तसेच या गायकांच्या संगीत संयोजनामध्ये अनिल धोत्रे (गिटार), नितीन खंडागळे आणि समत पठाण (कीबोर्ड), सोहम सोनवणे आणि अनिल बोर्डे (ड्रम सेट), श्रीधर मोरे (ड्रम मशीन), सारंग भांडवलकर (तबला पकवाच), पप्पू बँडलोक (ढोलक ढोलकी) या प्रिय वादकांनी रंगतदार साथ दिली. यावेळी समृद्धी झोडगे या लहान मुलीने चंद्रा गाण्यावर भन्नाट नृत्य सादर करून उपस्थितांचे मन जिंकत सर्वांचे लक्ष वेधले. तर जेष्ठ नागरिकांनी देखील विविध गाण्यांवर ठेका धरत मनसोक्तपणे या संगीत कार्यक्रमाचा आस्वाद घेतला. या गायक गायिकांनी मराठी चित्रपट संगीत, सुमग संगीत, भावसंगीत, नाट्य संगीत, लोकगीते, कोळीगीते, लावणी ते अगदी शास्त्रीय संगीत तसेच सदाबहार हिंदी गीत सादर करीत उपस्थित रसिकांना मंत्रमुग्ध करीत थिरकवले. दिवाळी पहाटचे स्वागत सुरांच्या मैफलीने साजरे करण्याची पद्धत गेल्या २५ ते ३० वर्षांपासून रूढ झाली आहे.

दिग्गज गायकांसह नवोदित गायकांचा सहभाग हे या मैफलींचे वैशिष्ट्य म्हणता येईल. स्वरांजली दीपावली पहाट या कार्यक्रमाच्या माध्यमातून एखाद्या मान्यवर गायकाला प्रत्यक्ष ऐकणे आणि त्याच्या सुरांची जादू अनुभविणे यात एक वेगळाच आनंदाचा अनुभव पिंपळे सौदागर परिसरातील रसिकांना आला. या दोन दिवसीय स्वरांजली दीपावली पहाट या सुरमयी संगीत कार्यक्रमाला रसिकांनी भरभरून प्रतिसाद देऊन यशस्वी केल्याबद्दल नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. अनिल गोंदकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# पिंपरी-चिंचवड महापालिका ठेकेदारावर मेहरबान!

## मोशी रुग्णालयाच्या वाढीव दराच्या निविदेला प्रशासनाची मान्यता



**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** महापालिका हद्दीमध्ये समाविष्ट झालेल्या गावांतील रहिवाशांसाठी मोशीमध्ये अत्याधुनिक सुविधांनी सज्ज ८५० खाटांचे रुग्णालय उभारण्यात येणार आहे. त्यासाठी महापालिका प्रशासनाने ठेकेदारावर मेहरबानी दाखवत पाच टक्के वाढीव दराची निविदा स्वीकारली आहे. ३४० कोटी रुपयांचा निविदेला स्थायी समितीने मान्यता दिली. रुग्णालयाच्या कामासाठी तीन वर्षांचा कालावधी देण्यात आला आहे. महापालिका हद्दीत १९९७ मध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमध्ये मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाले आहे. चिखली, मोशी, चऱ्होली या भागात मोठ्या गृहनिर्माण सोसायट्या होत आहेत. नागरीकरण वाढले आहे. पुणे जिल्ह्यातील खेड, चाकण, जुन्नर, मंचर, आंबेगाव या भागातील नागरिक उपचारासाठी शहरात येतात. हे रुग्ण वायसीएम रुग्णालयात दाखल होतात. शहराची लोकसंख्या आजमितीला २७ लाखांच्या घरात आहे. त्यामुळे महापालिकेच्या माध्यमातून चालवले जाणाऱ्या ७५० खाटांच्या वायसीएम रुग्णालयावर ताण येत आहे. वायसीएम रुग्णालयावरील ताण कमी करण्यासाठी मोशीत ८५० खाटांचे रुग्णालय उभारण्यात येणार आहे. त्यासाठी प्रसिद्ध केलेल्या निविदा प्रक्रियेत पाच ठेकेदारांनी सहभाग घेतला. यामध्ये तीन निविदा पात्र झाल्या होत्या. मे. वॅसकॉन इंजिनिअर्स लिमिटेड या कंपनीची ४.७३ टक्के वाढीव दराची निविदा स्वीकारली आहे. त्यानुसार ३४० कोटी ६७ लाख ६३ हजार २७३ रुपयांच्या खर्चाला स्थायी समितीने मान्यता दिली आहे.

> **“ शहरातील आरोग्य यंत्रणा सक्षम करण्याचा निर्धार केला आहे. त्यानुसार राज्य सरकार आणि महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा केला. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात हा प्रकल्प प्रशासकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे रखडला होता. मात्र, महायुती सरकारच्या काळात प्रकल्पाला गती देण्यात आली. मोशीत होणारे ८५० खाटांचे रुग्णालय जिल्ह्याची आरोग्यवाहिनी म्हणून ओळखले जाईल. प्रशासनाने पुढील प्रक्रिया करुन कामाला सुरुवात करावी.**
>
> **-महेश लांडगे, आमदार भोसरी**

# पुण्यात बांधकामांसाठी नियमावली

## बांधकामभोवती हिरव्या रंगाचे कापड लावणे बंधनकारक

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** देशाच्या अनेक भागांत सध्या वारे संथ झाले आहेत. मंद वाऱ्यांमुळे स्थानिक पातळीवर हवेत मिसळणारा धूर, धूळ दूर वाहून जात नसल्याने हवेची गुणवत्ता बिघडली आहे. त्याचा फटका पुण्यालाही बसला आहे. पुणे शहर राहण्यासाठी सर्वोत्तम शहरांपैकी एक मानले जाते. पूर्वीपासूनच उत्पादन, वाहनोद्योगाची पंढरी मानली जाणारी पुण्यनगरी आता माहिती तंत्रज्ञान म्हणजेच 'आयटी सिटी' म्हणूनही ओळखली जाते. याशिवाय सेवा क्षेत्रातील उद्योगांचाही पुण्यात मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला आहे. 'केजी टू पीजी' शिक्षणासाठी उत्तमोत्तम शैक्षणिक संस्थांचे जाळे असल्याने देशभरातील नागरिकांसाठी पुणे आकर्षणाचे केंद्र राहिले आहे. पुण्यात शिक्षणासाठी येणारे विद्यार्थी, नोकरीसाठी येणारे उमेदवार यापैकी अनेक जण पुण्यातच स्थायिक होतात. त्यामुळे पुण्याच्या चारही बाजूंना घरांसाठी मोठी मागणी आहे. परिणामी, शहरात काँक्रिटचे जाळे वेगाने वाढते आहे. काही वर्षांपूर्वीच लगतची ३४ गावे पुणे महापालिकेत आल्याने पुणे भौगोलिकदृष्ट्या राज्यातील सर्वांत मोठी महापालिका झाली



आहे. पुणे महापालिकेच्या हद्दीतील बांधकामांचे नियमन पुणे महापालिकेतर्फे होते. पुण्यालगतच्या गावांमधील बांधकामांवरील नियंत्रण, नियमनाची जबाबदारी पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाची आहे. बांधकाम परवाना विभाग पुणे महापालिकेला सर्वाधिक उत्पन्न मिळवून देणाऱ्या विभागांपैकी एक आहे. एक एप्रिल २२ ते ३१ मार्च २३ या आर्थिक वर्षात पालिकेने नव्या, सुधारित व अन्य अशा एकूण ३,२८७ गृहप्रकल्पांना मान्यता दिली. त्यातून पालिकेला १,६३६ कोटी रुपये महसूल मिळाला. चालू आर्थिक वर्षात आतापर्यंत पालिकेने १,१२९ प्रकल्पांना मान्यता दिली असून, त्यातून १,१९० कोटी रुपयांचा महसूल जमा झाला आहे. मात्र, मोठे प्रकल्प पूर्ण होण्यास तीन ते चार वर्षांचा कालावधी लागतो. असा विचार करता शहरात सध्या सुमारे साडेपाच हजार गृहप्रकल्पांचे काम सुरू असण्याची शक्यता आहे. या प्रकल्पातून उडणारी धूळ, धूर आणि अन्य घटक प्रदूषणात भर घालत आहेत. पानशेत धरणफुटीनंतर पेठांपुरतेच मर्यादित असलेले पुणे मग कोथरूड, कर्वे नगर, सहकारनगर, औंध आदी भागांत विस्तारले. विशेषतः कोथरूड, कर्वेनगर, सहकारनगर, औंध भागात १९८०च्या दशकात छोट्या इमारती उभ्या राहू लागल्या. २०००च्या दशकात येथील मोकळ्या जागा जवळपास संपुष्टात आल्या. आता इमारती बांधण्यासाठी मोकळी जागाच उरलेली नाही. त्यामुळे ३०-४० वर्षे होऊन गेलेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्याचा ट्रेंड आहे. मेट्रोच्या 'टीओडी झोन'मध्ये वाढीव चटई निर्देशांक देण्यात आल्याने बांधकाम क्षेत्राला चालना मिळाली आहे. दर तीन-चार इमारतींमागे एका इमारतीचा पुनर्विकास सुरू असल्याचे चित्र आहे. एका इमारतीच्या पुनर्विकासाचे काम साधारणतः १८ ते ३६ महिन्यांत पूर्ण होते. मात्र, त्यासाठी जुनी इमारत उतरवताना मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होते. नव्या इमारतीच्या बांधकामादरम्यानही प्रदूषणात भरच पडते. या इमारतींच्या बाजूने उंच पत्रे लावूनही त्याचा फायदा होत नसल्याने आजूबाजूच्या रहिवाशांना धूर-धूळ आणि प्रदूषणाचा सामना करावाच लागतो. त्यामुळे याबाबत पालिकेला प्रभावी उपाययोजना कराव्या लागणार आहेत. दुसरीकडे शहराच्या चारही बाजूला मोठ्या प्रमाणावर नवे गृहप्रकल्प उभारले जात आहेत. लगतची गावे काही वर्षांपूर्वीच पालिकेत आली आहेत. त्यामुळे तिथे पुरेशा सुविधा नसल्या, तरी पालिकेतर्फे तिथे पायाभूत सुविधा पुरविण्याचे नियोजन करून त्यानुसार कामे सुरू झाली आहेत. परिणामी, सध्या शहरापेक्षा कमी दरात गुंतवणूक म्हणूनही तिथे घर घेण्यास प्राधान्य दिले जात आहे. सध्या येथे मोकळ्या जागा असल्याने भविष्यात बांधकामामुळे होणाऱ्या प्रदूषणाची पातळी आटोक्यात आणण्यासाठी दीर्घकालीन उपायांची आणि ठोस कृतीची आवश्यकता आहे. प्रदूषण रोखण्यासाठी शहरातील मेट्रोचे जाळे विस्तारणे, पीएमपी सेवा अधिक सक्षम करणे, वृक्षतोड थांबवून वृक्षलागवड वाढवणे, अंत्यसंस्कारांसाठी अधिकाधिक विद्युतदाहिन्या उपलब्ध करणे, कचरा जाळण्यावर कडक प्रतिबंध लादणे, जलप्रदूषणावर नियंत्रण ठेवणे आदी उपायही गरजेचे आहेत. त्याकडे पालिकेला दुर्लक्ष करता येणार नाही.

### पर्यावरणपूरक विकास हवा

**» शहरातील वाढत्या प्रदूषणाचा विषय उच्च न्यायालयापर्यंत पोहोचला आहे. मुख्य सचिवांनीही या संदर्भात आदेश दिले आहेत. महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. त्यानुसार महापालिका आयुक्त तथा प्रशासक विक्रमकुमार यांनी नवी नियमावली जाहीर केली. त्यानुसार कार्यवाही करून दैनंदिन अहवाल सादर करण्याच्या सूचना आयुक्तांनी प्रशासनाला दिल्या आहेत. त्यासाठी हवा प्रदूषण नियंत्रण पथकेही स्थापन करण्यात आली आहेत. शहराच्या विस्तार आणि विकासाचा वेग वाढतच जाणार आहे. त्यामुळे हा विकास अधिक शाश्वत व पर्यावरणपूरक कसा होईल, यावर प्रशासनाला भर द्यावा लागणार आहे.**

# ललित पाटील १७ लाख कुणाला द्यायचा?

## आमदार रवींद्र धंगेकरांचे खळबळजनक आरोप

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात ललित पाटील ड्रग्ज तस्करी प्रकरण गाजत आहे. याप्रकरणी शुक्रवारी विभागीय चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे. यानंतर ससून रुग्णालयाचे डीन डॉ. संजीव ठाकूर यांना बडतर्फ करण्यात आलं आहे, तर अन्य एका वैद्यकीय अधिकाऱ्याला निलंबित करण्यात आलं आहे. या सर्व घडामोडींवर पुण्याच्या कसबा मतदारसंघाचे काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर यांनी प्रतिक्रिया केली आहे. ललित पाटलाकडून पोलीस आयुक्त कार्यालयाला हफ्ते दिले जात होते, असा गंभीर आरोप धंगेकर यांनी केला आहे. प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना आमदार रवींद्र धंगेकर म्हणाले, ललित पाटीलने कालच (शुक्रवार, १० नोव्हेंबर) सांगितलं की, मी १७ लाख रुपये देत होतो. ज्यांना ज्यांना पैसे दिले, त्यांची





पोलिसांनी चौकशी केली नाही. मी दोन दिवसांपूर्वी तपास अधिकाऱ्यांना भेटलो आणि सांगितलं की, आरोपी अधिकाऱ्यांकडून रकमेची वसुली करा आणि त्यांना अटक करा. काल शासनाचा अहवाल आला आणि त्यामध्ये ललित पाटील प्रकरणात ससूनचे डीन डॉ. संजीव ठाकूर यांना पदमुक्त केलं आहे. पण तो अहवाल एक नौटंकी आहे. संजीव ठाकुरांना वाचवण्याचं काम सरकार करत आहे. खरं तर, त्यांच्यावर मोक्का अंतर्गत कारवाई झाली पाहिजे, याची मागणी मी वारंवार करत आहे. ललित पाटील प्रकरणी पोलीस व्यवस्थित चौकशी करत नाहीयेत. पोलीस खातं गृहमंत्र्यांच्या आणि शासनााच्य दबावाखाली काम करतंय. पुण्यात हुक्का पार्लर, ड्रग्ज आणि अमली पदार्थांचे धंदे राजरोसपणे पोलिसांच्या आशीर्वादाने सुरूआहेत. हे मी सातत्याने बोलतोय. यावर पडदा टाकण्यासाठी पोलीस संजीव ठाकूर यांना अटक करत नाहीयेत. आज लाखो रुपये आयुक्त कार्यालयात हफ्त्याच्या रुपाने गोळा होतात. हे जर ऐकले नाहीत, तर आम्ही लोकशाही पद्धतीने जे काही करता येईल ते करू, असंही रवींद्र धंगेकर म्हणाले.

# प्रदूषणाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर

## अलंकापुरीत इंद्रायणी नदीच्या पाण्यावर तवंग



पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी। आळंदी येथील इंद्रायणी नदीतील पाण्यावर जलप्रदूषणामुळे पुन्हा मोठ्या प्रमाणात तवंग आले. त्यामुळे श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या इंद्रायणीचे पावित्र्य धोक्यात आले असून, नदीच्या प्रदूषणाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. इंद्रायणी नदीचा उगम लोणावळा परिसरातून झाला आहे. ही नदी अनेक गावे, शहर पार करत आळंदीतून पुढे वाहत जाते. मात्र, पिंपरी-चिंचवडमधील औद्योगिक वसाहती, इंद्रायणी नदीकाठच्या कारखान्यातील रसायनयुक्त पाणी, गावांमधील मैलायुक्त पाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता थेट इंद्रायणी नदी पात्रात सोडले जाते.

मैलायुक्त पाण्यामुळे इंद्रायणी नदी प्रदूषित होत आहे. शुक्रवारी रात्री आळंदी परिसरात जोरदार पाऊस झाला. त्यानंतर नदीतील पाण्यावर मोठ्या प्रमाणात तवंग आले. इंद्रायणी नदी पात्रात लाखो वारकरी मोठ्या श्रद्धेने स्नान करून माऊलींचे दर्शन घेतात. परंतु, नदीची अवस्था बघता लाखो वारकऱ्यांचे आणि आळंदीतील ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे. आधीच जलपर्णीने इंद्रायणीचा श्वास गुदमरत आहे. आता त्यात जलप्रदूषणाची भर पडली असून अवघ्या नदी पात्रात तवंग दिसत आहे.

> **पवना, इंद्रायणी नद्यांची दुरवस्था झाली आहे. उद्योजक, गृहनिर्माण संस्थांमधील मैलामिश्रित पाणी थेट नदीत सोडले जाते. नद्या प्रदूषित करणाऱ्या कंपन्या, संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करावी.**
>
> **— मारुती भापकर, सामाजिक कार्यकर्ते**

रसायनयुक्त पाणी सोडल्यानेच नदीची अशी अवस्था झाल्याची चर्चा आहे. दैनंदिन वापरातील ६० ते ६५ दशलक्ष लिटर (एमएलडी) सांडपाणी प्रतिदिन कोणतीही प्रक्रिया न करता थेट इंद्रायणी नदीत सोडले जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

नदीत घरगुती आणि औद्योगिक सांडपाणी, मैला सोडल्यामुळे नदी प्रदूषित झाली आहे. जिल्हा प्रशासन, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ५७७.१६ कोटी रुपयांचा नदीसुधार प्रकल्प तयार केला असून, राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाने तो स्वीकारला आहे. मात्र, हा प्रकल्प केंद्र शासनाच्या मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे.

# कोकण किनारपट्टीवरील प्रदूषण धोकादायक पातळीवर

## रसायनांमुळे सागरी आणि मानवी आरोग्य धोक्यात



पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी। राज्याला लाभलेली ७२० किलोमीटरची कोकण किनारपट्टी प्रदूषणामुळे धोकादायक पातळीवर पोहोचल्याचे संशोधनातून समोर आले आहे. किनारपट्टी प्रदूषित करणाऱ्या घटकांमध्ये सूक्ष्म प्लॅस्टिक, औषधांतील रासायनिक घटकांचा समावेश असून, या प्रदूषणामुळे सागरी जीवन आणि मानवी आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. प्राग येथील चेक युनिव्हर्सिटी ऑफ लाइफ सायन्सेस आणि मुंबईतील महाराष्ट्र महाविद्यालय यांनी राज्याच्या पश्चिम किनारपट्टीवरील प्रदूषणाबाबत संशोधन केले. या संशोधनाबाबतचा शोधनिबंध 'सायन्स ऑफ द टोटल एन्व्हायर्न्मेंट' या संशोधन पत्रिकेत प्रसिद्ध झाला. प्रदीप कुमकर, चांदनी वर्मा, प्रा. लुकाश कालोस, डॉ. सचिन गोसावी यांच्या मार्गदर्शनाखालील संशोधकांच्या चमूमध्ये स्टेफान हायसेक, मनोज पिसे, सोनिया झाल्टोवस्का, फिलिप मर्कल, मातेय बोझिक, लुकास प्रौस, कतरिना हँकोव्हा, राडेक रिन, पावेल कलौचक, मिस्लोव पेट्रटिल यांचा समावेश होता. संशोधनासाठी मुंबई ते वेंगुर्ला या भागातील किनारपट्टीची दक्षिण, मध्य आणि उत्तर अशी विभागणी करून त्यातील १७ ठिकाणी सखोल अभ्यास करण्यात आला. त्यात औद्योगिक ठिकाणे, मासेमारी बंदरे, लोकप्रिय पर्यटनस्थळे यांचा समावेश होता. या १७ पैकी १५ ठिकाणी सूक्ष्म प्लॅस्टिकचे अस्तित्व आढळून आले. त्यात उत्तर कोकण किनारपट्टी सूक्ष्म प्लॅस्टिकमुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषित असल्याचे दिसून आले. या सूक्ष्म प्लॅस्टिक धोकादायक घटकांचे वाहक असल्याने पर्यावरणीय, तसेच आरोग्याचे प्रश्न निर्माण होऊ शकतात. त्याशिवाय मेटोप्रोलोल, ट्रामाडोल, वेन्लाफॅक्सिन, ट्रायक्लोसन, बिस्फोनेल ए, बिस्फोनेल एस असे रासायनिक घटक किनारपट्टीवरील पाण्यात आढळून आले. हे रासायनिक घटक औषधे, तसेच दैनंदिन वापरातल्या वस्तूंमध्ये असतात. उच्च रक्तदाबावरील उपचारांमध्ये मेटोप्रोलोल, वेदनाशामक औषधांमध्ये ट्रामाडोल, तर मानसोपचारातील औषधांमध्ये वेलानफॅक्सिन हा घटक वापरला जातो.

> **या संशोधनात मासे, शैवाल, कोळंबी, खेकडे यांची तपासणी करून पर्यावरणाला निर्माण होणारा धोकाही अभ्यासण्यात आला. त्यात ७० टक्क्यांहून अधिक ठिकाणांना उच्च ते मध्यम पर्यावरणीय धोका असल्याचे आढळले. ही बाब गंभीर आहे. प्रदूषण रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना हाती घेण्याची आवश्यकता आहे.**
>
> **— प्रदीप कुमकर, संशोधक-मार्गदर्शक**